# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:14.04.2026** **वार: मंगळवार**

1. महिला सक्षमीकरणासाठी सर्वांना एकत्र येण्याचं पंतप्रधानांचं आवाहन
2. राज्य शासनाच्या विविध पदांच्या भरती प्रक्रियेत सुधारणा करण्याला मंत्रिमंडळाची मंजूरी
3. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यभरात अभिवादन कार्यक्रम
4. ठाणे जिल्ह्यात मुरबाडजवळ झालेल्या रस्ते अपघातात 11 जणांचा मृत्यू
5. विख्यात पार्श्वगायिका आशा भोसले अनंतात विलीन आणि
6. यंदा दीर्घकालीन सरासरीपेक्षा कमी मोसमी पावसाचा अंदाज

**नारीशक्ती वंदन**

महिलांसाठीच्या संधींचा विस्तार करून महिला सक्षमीकरण करण्यासाठी सर्वांनी एकत्र यावं, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्लीत नारीशक्ती वंदन संमेलन कार्यक्रमात बोलत होते. महिलांचे परिश्रम, धैर्य आणि आत्मविश्वास यांच्या बळावर भारतातील नारीशक्तीनं नवी उंची गाठली आहे, 21व्या शतकातील एक महत्त्वाचा निर्णय घेऊन आपली संसद लवकरच नवा इतिहास घडवेल, असं सांगताना पंतप्रधान म्हणाले....

**हमारे देश की संसद एक नया इतिहास रचने के करीब है। एक ऐसा नया इतिहास जो अतीत की संकल्पनाओं को साकार करेगा, जो भविष्य के संकल्पों को पूरा करेगा। एक ऐसे भारत का संकल्प जो समता मूलक हो, जहां सामाजिक न्याय केवल एक नारा न हो, लेकिन हमारी कार्य संस्कृति का, हमारे work culture का, हमारी निर्णय प्रक्रिया का, स्वाभाविक हिस्सा हो।**

**मंत्रीमंडळ निर्णय**

राज्य शासनाच्या विविध पदांची भरती प्रक्रिया सुटसुटीत, सक्षम आणि उमेदवारांच्या दृष्टीने सुलभ व्हावी, याकरता पदभरती प्रक्रियेत सुधारणा करण्याला काल मंत्रिमंडळानं मान्यता दिली. अधिक एकसंध, सुलभ, पारदर्शक, परिणामकारक आणि कालबद्ध निवड प्रक्रिया राबवण्यासाठी या सुधारणा करण्यात येणार आहेत. त्यानुसार अराजपत्रित पदांसाठी कुठलीही मुलाखत यापुढं होणार नाही. तसंच पदभरतीमधल्या सुधारणेमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या विविध सेवांतर्गत संवर्गांची संख्या 102 होणार आहे. तर संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्यानं 18 सेवांचा आणि 93 संवर्गाचा समावेश होईल.

नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी योजनेतून सागरी जिल्ह्यात मासळी उतरवण्याच्या मूलभूत सोयी सुविधा उभारण्यासाठी 61 कोटी 24 लाख रुपयांच्या कामांना मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. मंत्रीमंडळानं इंडियन एज्युकेशन सोसायटी या संस्थेला मुंबईत आयईएस तंत्रज्ञान कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मंजुरी दिली. या कौशल्य विद्यापीठात कौशल्य विकासाचे विविध अभ्यासक्रम शिकवले जाणार आहेत.

राज्यातील वैद्यकीय शिक्षण, नर्सिंग आणि आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सशक्तीकरण प्रकल्प राबवण्यात येणार आहे. त्यासाठी जपानच्या जायका कंपनीकडून 3 हजार 708 कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्याला मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

आकांक्षित जिल्हा आणि आकांक्षित तालुका कार्यक्रमाचा विस्तार करण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं कालच्या बैठकीत घेतला. त्यानुसार या कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे आणि परभणी या सहा जिल्ह्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

राज्यातील वैद्यकीय व्यावसायिकांची नोंदणी आणि नियमन करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियमात सुधारणा करण्याला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. या सुधारणेनुसार परिषदेवरील सदस्यांची नियुक्ती राज्य शासनाला नामनिर्देशन पध्दतीनं करता येणार आहे.

तत्पूर्वी राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत काल ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आशा भोसले यांच्या संकल्पनेतील संगीत संस्था स्थापन करण्यासाठी सकारात्मक पावलं उचलण्यात येतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**आंबेडकर जयंती**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती राज्यासह देशभरात आज साजरी केली जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी डॉक्टर आंबेडकर यांना अभिवादन केलं आहे आणि देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्तानं राज्यात सर्वत्र विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीनं सकाळी साडेनऊ वाजता अभिवादन सोहळा आयोजित केला आहे. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, यांच्यासह पुण्यातील सर्व खासदार, आमदार, वरीष्ठ शासकीय अधिकारी आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. राज्यात इतरत्रही डॉक्टर बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरखेड इथल्या मुख्याध्यापिका अलकंनंदा परिहार यांनी भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आकर्षक रांगोळी साकारली आहे. सांगलीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 14 फुटी उंच पूर्णाकृती पुतळ्याचं लोकार्पण आमदार संजय बनसोडे यांच्या हस्ते काल करण्यात आलं.

राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्तृत्वावर हा एक प्रकाशझोत....

**देशाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनं आजही महत्त्वाच्या असलेल्या अनेक क्षेत्रांमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मूलभूत काम केलं, विपुल लेखन केलं, आपल्या भूमिका ठोस आणि ठामपणे मांडल्या. राज्यघटनेचा मसुदा तयार झाल्यावर तो संसदेमध्ये चर्चेसाठी मांडण्यात आला, त्यावर सात हजार हरकती नोंदविण्यात आल्या होत्या. प्रत्यक्ष चर्चा सुरू झाली त्यावेळी त्यातल्या तब्बल दोन हजार हरकतींना उत्तरं 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' म्हणविल्या जाणाऱ्या एकट्या बाबासाहेबांनी दिली. आपल्या अनुयायांना सांगितलं, 'आता क्रांतीची, संघर्षाची गरज नाही, आपले प्रश्न संवैधानिक प्रक्रियेतून, त्या पद्धतीनं मांडा'. चवदार तळे सत्याग्रह झाल्यावर, दलितांना मंदिर प्रवेशासाठी आंदोलन केल्यावरही त्याबाबतचा कोणताही विद्वेष मनात न ठेवण्याचं आवाहन त्यांनी अनुयायांना केलं, कारण बंधुतेच्या तत्त्वावर त्यांचा दृढ विश्वास होता. बौद्ध धर्म स्वीकारल्यावर हिंदुत्वावर आगपाखड न करता ते लिहितात, 'मी फक्त खोली बदलली, घर नव्हे'. महापुरुषांनाही जातिधर्माची लेबलं लावून त्यामध्ये विभागणाऱ्या आपल्याला त्यांचं हे चौकटीपल्याडचं मोठेपण कळणं हीच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना खरी आदरांजली ठरेल. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून डॉक्टर स्वाती महाळंक.**

**म्हाडा-नाशिक**

गरीबांना घरे देण्याच्या योजनेत म्हाडाला घरे न देता फसवणूक केल्या प्रकरणी नाशिकमधील 193 विकासक आणि त्यांच्या भागीदारांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणात अधिक तपास करण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांच्या नेतृत्वाखाली हे पथक तपास करणार आहे.

**खरात-नाशिक**

भोंदूबाबा अशोक खरात आणि इतरांविरुद्ध सक्तवसुली संचालनालयानं कारवाई सुरू केली आहे. खरातच्या नाशिक, पुणे आणि शिर्डीतल्या ठिकाणांवर काल ईडीनं छापे टाकले.

**अपघात-ठाणे**

ठाणे जिल्ह्यात कल्याण-अहिल्यानगर मार्गावर रायते पुलावर काल सकाळी झालेल्या अपघातात 11 जणांचा मृत्यू झाला. मुरबाड जवळ एक खासगी वाहन आणि सिमेंट मिक्सर ट्रक यांच्यात समोरासमोर धडक झाल्यामुळे हा अपघात घडला.

**अंत्यसंस्कार**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या पार्थिवावर काल मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आशा भोसले यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, अन्य मंत्री यांच्यासह चित्रपट आणि संगीत क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आशाताईंच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करुन श्रद्धांजली वाहिली. चित्रपट सृष्टीतल्या काही गायकांनी आशाताईंची गाणी गाऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली. काल सकाळपासून आशा भोसले यांचं पार्थिव त्यांच्या घरी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं; यावेळी विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी त्यांचं अंत्यदर्शन घेतलं.

**पावसाचा अंदाज**

जून ते सप्टेंबर दरम्यान होणारा नैऋत्य मोसमी पाऊस यावर्षी सरासरीपेक्षा कमी असेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे. देशात यंदा दीर्घकालीन सरासरीच्या 92 टक्के पाऊस पडेल असं भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी काल माध्यमांशी बोलताना सांगितलं. नैऋत्य मोसमी पावसाच्या काळात एल निनोचा प्रभाव असेल असा अंदाज मान्सूनचा अंदाज देणाऱ्या प्रणालीनं वर्तवला असल्याचं ते म्हणाले.

**हवामान**

राज्यात काही ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत काहीशी वाढ झाली आहे. आज मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हवामान उष्ण आणि दमट असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**